महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीबीटी-०६२२/प्र.क्र.३४/२०२३/३१ दिनांक - ०१ फेब्रुवारी, २०२४

- :**प्रसिद्धीपत्रक**:-

**विषय** :- संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांबाबत.

**संदर्भ** :-(१)आयोगाचे क्रमांक:-ऑ.प./उ.ता./२०२२/१६, दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
(२)आयोगाचे क्रमांक:- एमआयएस-०१२०/सीआर-३३/२०२१/मा.तं., दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
(३)आयोगाचे क्रमांक:-एमआयएस-०१२०/सीआर-०४/२०२०/मा.तं., दिनांक ०१ जुलै, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

आयोगामार्फत घेण्यात येणा-या संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिका अंतिम करण्यासंदर्भात संदर्भाधीन क्रमांक १ च्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कार्यपध्दती निश्चित करण्यात आली होती. सदर कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याबाबतचा निर्णय आयोगाकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार यापुढे आयोजित केल्या जाणा-या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांबाबत स्पर्धा परीक्षांना लागु असलेल्या प्रचलीत पध्दतीनुसार परीक्षेनंतर प्रथम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येईल व त्यावर उमेदवारांच्या हरकती मागविण्यात येतील.

२. आयोगामार्फत यापुढे प्रसिध्द करण्यात येणा-या सर्व चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकेवर उमेदवारांच्या हरकती मागविण्यासंदर्भातील आयोगाचे संदर्भाधीन क्रमांक २ व ३ चे प्रसिध्दीपत्रक लागु राहील व त्याप्रमाणे कार्यवाही पार पाडण्यात येईल.

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई